**प्रसिद्धी पत्रक**

# उत्सवी हंगाम उंबरठ्यावर येऊन पोहोचला असताना किराणा दुकाने आणि एमएसएमईंना सहकार्य करण्यासाठी फ्लिपकार्ट होलसेलचे १२ नवीन शहरांमध्ये विस्तारीकरण

- फॅशन कॅटेगरीसह १२ नव्या शहरांमध्ये नेटवर्कचे विस्तारीकरण; हजारो किराणा दुकाने आणि लघु व मध्यम उद्योगांसाठी (एसएमबी) डिजिटल कॉमर्स ॲक्सेस केला उपलब्ध

**बंगळुरू – २४ सप्टेंबर २०२०** : भारतातील फ्लिपकार्ट ग्रुपची डिजिटल बी२बी बाजारपेठ असलेल्या फ्लिपकार्ट होलसेलतर्फे आज १२ नवीन शहरांमध्ये विस्तारीकरण करत असल्याची घोषणा करण्यात आली. या माध्यमातून रिटेल इकोसिस्टिमला वन-स्टॉप रिटेल मार्केटप्लेस सोल्युशन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे लघु उद्योगांना विविध प्रकारची उत्पादने वाजवी किमतीमध्ये उपलब्ध होणार आहेत. या शहरांमध्ये फॅशन कॅटेगरीसह विस्तारीकरण करण्यात येणार असून फ्लिपकार्ट होलसेल किराणा दुकाने आणि एमएसएमईंचे (सूक्ष्म व लघु व मध्यम उद्योजक) डिजिटल परिवर्तन घडवून त्यांना वेगाने प्रगती करण्यास, ग्राहकांना बांधून ठेवण्यास आणि त्यांची नफा मिळविण्याची क्षमता वाढविण्यास मदत करणार आहे.

उत्सवी हंगाम उंबरठ्यावर येऊन ठेपलेला असताना फ्लिपकार्ट होलसेल आता गाझियाबाद, फरिदाबाद, म्हैसूर, चंदिगड ट्रायसिटी, मेरठ, आग्रा, जयपूर, ठाणे-भिवंडी-उल्हासनगर, बृहन्मुंबई, वसई-विरार-मिरा-भाइंदर, ठाणे (कल्याण डोंबिवली) आणि ठाणे (नवी मुंबई) येथे कारभार सुरू करणार आहे.

**फ्लिपकार्ट होलसेलचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि प्रमुख आदर्श मेनन** म्हणाले, “उत्सवांचा हंगाम सुरू होत असताना आम्ही १२ शहरांमध्ये विस्तारीकरण करताना अत्यंत उत्साहात आहोत. एमएसएमई आणि किराणा दुकानांसाठी अधिक संधी तयार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. ट्रेंडी जयपूरी कुर्तींपासून ते म्हैसूर सिल्क साड्यांपर्यंत, छोट्या उद्योगांनी डिजिटल परिवर्तन स्वीकारावे आणि अधिक भक्कम व्यवसायरूप घडवावे यासाठी त्यांची मदत करणे हा आमचा हेतू आहे. लाँचपासूनच आम्ही अनेक आघाडीच्या ब्रँड्सशी भागीदारी केली आहे आणि एसएमबींसाठी व किराणा दुकानांसाठी डिजिटल माध्यमातून व्यवसाय सुलभता आणली आहे. फ्लिपकार्ट इकोसिस्टिममधील मायक्रो-मार्केट पातळीवरील बीटूबी आणि बीटूसीमधील बारकाव्यांच्या मदतीने त्यांच्या क्षेत्राशी संबंधित ग्राहकांच्या मागण्या समजून घेण्यास त्यांना सक्षम केले आहे, जेणेकरून ते योग्य उत्पादनांची खरेदी व विक्री करू शकतील. आमच्या उपक्रमामुळे देण्यात येणाऱ्या योगदानामुळे होणारी एमएसएमई आणि किराणा दुकानांची भरभराट पाहण्यास आम्ही उत्सुक आहोत आणि या माध्यमातून भारतात लाखो नव्या व रोमांचक रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत.”

या वर्षाच्या अखेरपर्यंत फ्लिपकार्ट होलसेलची गृह व किचन आणि किराणा विभागांमध्ये विस्तारीकरण करण्याची योजना आहे.

फ्लिपकार्ट होलसेच्या ग्राहकांसाठी आघाडीच्या बँका व एनबीएफसींशी भागीदारी करून सुलभ अर्थसहाय्य सुविधा उपलब्ध होतील, जेणेकरून ते रोखीच्या आवागमनाचे व्यवस्थापन होऊ शकेल. या माध्यमातून फ्लिपकार्ट अॅश्युअर्ड दर्जेदार उत्पादने, सुलभ व सोयिस्कर ऑर्डर रिटर्न्स आणि त्यांच्या दुकानापर्यंत उत्पादनाची वेगवान डिलिव्हरी होऊ शकेल, तसेच ऑर्डर ट्रॅकिंगची सुविधाही मिळणार आहे.

त्याचप्रमाणे भागीदार फ्लिपकार्ट होलसेल टीमच्या भक्कम मर्चंडायझिंग अनुभवाचा आणि ब्रँड्सशी असलेल्या भागीदारीचा लाभ घेऊ शकतात, जेणेकरून ते असे एक मॉडेल विकसित करू शकतील व वाढवू शकतील, ज्याने किराणा व एमएसएमई फ्लिपकार्ट होलसेल बिझनेसच्या केंद्रस्थानी येतील.

भारत ही एक प्रगतीशील बाजारपेठ आहे. या फ्लिपकार्ट होलसेलचे १२ शहरांमध्ये विस्तारीकरण हे राष्ट्रीय पातळीवर डिजिटल परिवर्तन घडवून आणण्यासाठीचे एक पाऊल आहे. फ्लिपकार्टने स्थानिक पातळीवर विकसित केलेली भक्कम तंत्रज्ञान क्षमता, कन्झ्युमर ई-कॉमर्स सेगमेंटमधील व्यापक लीडरशिप आणि भारतातील उद्योगांची वैशिष्ट्यपूर्ण समज यामुळे भारताच्या रिटेल अर्थव्यवस्थेचे अविभाज्य घटक असलेल्या किराणा आणि एमएसएमईसाठी व्यवसाय करणे अधिक सुलभ होऊ शकेल.

फ्लिपकार्ट होलसेलबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया https://flipkartwholesale.com/ या वेबसाइटला भेट द्या.

फ्लिपकार्ट होलसेल अॅप गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे.

**फ्लिपकार्ट ग्रुपबद्दल**

फ्लिपकार्ट ग्रुप हा भारतातील एक आघाडीचा डिजिटल कॉमर्स उद्योगसमूह आहे आणि त्यात फ्लिपकार्ट, मिंत्रा आणि फोनपे या ग्रुप कंपन्यांचा समावेश आहे. फ्लिपकार्टची स्थापना २००७ साली झाली. फ्लिपकार्टने लाखो ग्राहक, विक्रेते, व्यापारी आणि लघु उद्योगांना भारताच्या ई-कॉमर्स क्रांतींचा एक भाग होण्यासाठी सक्षम केले. त्यांचे २५० मिलियनहून अधिक नोंदणीकृत ग्राहक आहे, त्यांच्यातर्फे ८०+ विभागांमध्ये १५० मिलियनहून अधिक उत्पादने उपलब्ध करून देण्यात येतात. भारतात ई-कॉमर्सचे लोकशाहीकरण होण्यासाठी आमचे प्रयत्न, उत्पादनांची उपलब्धता आणि वाजवी किंमतीत उत्पादने उपलब्ध करून देणे, ग्राहकांना समाधान देणे, या अर्थचक्रामध्ये लाखो रोजगारांची निर्मिती करणे आणि उद्योजकांच्या व एमएसएमईच्या अनेक पिढ्या घडविणे यामुळे या क्षेत्रातील अनेक गोष्टींचे उद्गाते होण्यास आम्हाला प्रेरणा मिळाली. फ्लिपकार्ट होलसेल या आमच्या नव्या डिजिटल मार्केटप्लेसचा लाँच हा भारतातील किराणा व एमएसएमईच्या वाढीचा वेग वाढविण्यासाठी असलेल्या आमच्या निष्ठेचा द्योतक आहे. कॅश ऑन डिलिव्हरी, नो कॉस्ट ईएमआय आणि सुलभ रिटर्न्स या ग्राहककेंद्री अभिनव उपक्रमांची सुरुवात फ्लिपकार्टने केली. त्यामुळे लाखो भारतीयांसाठी ऑनलाइन खरेदी अधिक व्यवहार्य आणि परवडण्याजोगी झाली. ऑनलाइन फॅशन मार्केटमध्ये भक्कम स्थान निर्माण केलेली मिंत्रा,

भारतातील सर्वात वेगाने वाढणारा डिजिटल पेमेंट प्लॅटफॉर्म असलेला फोनपे आणि आता फ्लिपकार्ट होलसेल, फ्लिपकार्ट ग्रुप तंत्रज्ञानाच्या माध्यमातून भारतातील व्यवसायक्षेत्राचे परिवर्तन घडविण्याचे कार्य सुरूच ठेवणार आहे.

**अधिक माहितीसाठी media@flipkart.com या ईमेल अ‍ॅड्रेसवर संपर्क साधावा.**